# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

"सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५२३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

नॅकद्वारा पुर्नमूल्यांकित 'अ' श्रेणी प्राप्त

## (परीक्षा नियंत्रक कार्यालय)

विद्यापीठाचे लक्ष्मीनारायण तंत्रशास्त्र संस्थेचे परिसर, अमरावती मार्ग, नागपूर – ४४० ०३३.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५५०५४७, E-mail : coe@nagpuruniversity.nic.in

क्रमांक : रातुमनावि/प.नि./व्या.प/१७/९४७ दिनांक : २ डिसेंबर २०१७

## :: प रि प त्र क ::

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे प्रमुख, संचालित व संलग्नित महाविद्यालयाच्या सर्व प्राचार्यांना आणि विद्यार्थ्यांना या परित्रकाद्वारे कळविण्यात येत आहे की, विद्यापीठाच्या उन्हाळी/हिवाळी–२०१५ आणि उन्हाळी/हिवाळी–२०१६ परीक्षांच्या पदव्या (पदवी/पदव्युत्तर/आचार्य पदवी व पदविका) National Academic Depositaries (NAD) या संस्थेच्या संकेतथळावर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

विद्यापीठाच्या उन्हाळी/हिवाळी–२०१५ आणि उन्हाळी/हिवाळी–२०१६ ह्या परीक्षांच्या ऑनलाईन पदवींमध्ये, विद्यापीठाच्या उपरोक्त पदवीप्राप्त सर्व विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे प्रमुख, संचालित व संलग्नित महाविद्यालयाच्या सर्व प्राचार्यांनी, खालील नमूद केलेल्या तक्त्यांमध्ये सदरची संपूर्ण माहिती परीक्षा विभागाचे उपकुलसचिव (परीक्षा पूर्व) डॉ. नवीन मुंगळे यांच्याकडे सत्यप्रतीमध्ये त्वरित सादर करावी. जेणेकरून सदर माहितीच्या आधारे संबंधीत विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक पदवींबरोबर जोडण्यात येऊन सदर पदवीची पळताळणी ही विद्यापीठाद्वारे करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदर पदवींची पळताळणी प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर सदरची पदवी संबंधीत विद्यार्थ्यांना National Academic Depositaries (NAD) या संस्थेच्या संकेतस्थळावर पहाता येईल.

### तक्ता

**महाविद्यालयाचे नांव** : ........................................................ E-Mail ID ....................................

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नांव | अभ्यासक्रमाचे नांव | परीक्षेचे नांव व उत्तीर्ण वर्ष | विद्यार्थ्यांचे परीक्षा आसन क्रमांक | आधार क्रमांक | भ्रमणध्वनी क्रमांक | ई–मेल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |

सदर तक्त्यामधील माहितीचे आधारे विद्यापीठाकडून सदर पदवीची पडताळणी झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या आधार क्रमांक द्वारा National Academic Depositaries (NAD) या संस्थेच्या संकेतथळावर जाऊन https://nad.ndml.in वर नोंदणी करून घ्यावी. त्यानंतर संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांचे ऑनलाईन पदवी प्रमाणपत्र उपलब्ध करून घेता येईल.

सदर माहितीच्या संदर्भातील विभाग प्रमुख, प्राचार्य आणि विद्यार्थ्यांना काही चौकशी करावयाची झाल्यास दूरध्वनी क्रमांक ०२२–४९१४२५५०/२५९३/२५९६ किंवा E-Mail ID. nad@nsdl.co.in वर संपर्क साधावा.

(डॉ. निरज खटी)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रतिलिपी माहिती व योग्य कार्यवाहीस्तव अग्रेषित:**

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे सर्व विभाग प्रमुख.
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य.
३. मा. कुलगुरूंचे, मा. प्र–कुलगुरूंचे व मा. कुलसचिवांचे स्वीय सहायक.
४. वित्त व लेखा अधिकारी.
५. विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील सर्व अधिकारी व शाखा प्रमुख

PVC-EXAM/LETTER/YB/11